East : 1992
NAAC "A++" Grade
with CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. – ४१६००४ महाराष्ट्र
PHONE : EPABX 0231-260900, 2609185 थेट : 2609298, 2609112, 2609110
FAX : 0091-0231-2690655, 2691533 व 0091-0231-2692333
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

**Ref. No. SU/Exam/Lapses/** DBEE/03. **Date :** 15 FEB 2022

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक व अधिविभागप्रमुख,
सर्व संलग्नीत महाविद्यालय व परिसंस्था तसेच विद्यापीठ अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :- ऑक्टोंबर/नोव्हेंबर-२०२१ हिवाळी सत्रातील परीक्षेत गैरप्रकार करणा-या परीक्षार्थींवर संगणकप्रणालीद्वारे पर्यवेक्षण(Proctoring) बाबत.

महोदय/महोदया,

आपणास विदित आहेच की, ऑक्टोंबर/नोव्हेंबर-२०२१ हिवाळी सत्र परीक्षा दि.१४/०२/२०२२ पासून ऑनलाईन मोडद्वारे सुरळीतपणे सुरू आहेत. सदर परीक्षेत गैरप्रकार करणा-या परीक्षार्थीवर संगणकप्रणालीद्वारे पर्यवेक्षण(Proctoring) करणेसाठी विद्यापीठाकडून पथक नेमण्यात आले असून परीक्षेत वेगवेगळया प्रकारे गैरप्रकार करणा-या परीक्षार्थीवर या पथकाकडून विद्यापीठ नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. तरी आपल्या स्तरावरून खालीलप्रमाणे बाबी परीक्षार्थीच्या निदर्शनास आणाव्यात.

1. सदर परीक्षा ऑनलाईन वस्तुनिष्ठ स्वरूपात असलेने परीक्षार्थींनी आपल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा उदा. मोबाईल, लॅपटॉप इ. चा कॅमेरा पूर्ण परीक्षा संपेपर्यंत सुरू ठेवणे बंधनकारक आहे. कॅमेरा बंद करणे, चेहरा दिसणार नाही अशा स्थितीत उपकरण ठेवू नये.
2. परीक्षार्थींनी परीक्षेसाठी वापरण्यात येणा-या इलेक्ट्रॉनिक उपकरणाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही उपकरणाचा वापर करू नये.
3. परीक्षेदरम्यान परीक्षार्थीनी अन्य कोणाशी संभाषण करू नये.
4. परीक्षार्थींनी परीक्षा एकटयानेच स्वतंत्रपणे द्यावी शेजारी अन्य कोणासही बसवू नये.
5. उपकरणाच्या एका विन्डो/ब्राउजरवर परीक्षा देत असताना अन्य विन्डो/ब्राउजर उघडू नये.
6. परीक्षा ही दृश्य स्वरूपात असल्याने हेडफोन, इयर बड इ. सारख्या उपकरणाचा वापर करू नये.
7. परीक्षेसाठी वापरत असलेल्या उपकरणावरील मजकूराचा अन्य उपकरणाच्या माध्यमातून फोटो घेवू नये.
8. परीक्षेवेळी परीक्षार्थींनी अन्य व्यक्तींशी दूरध्वनीद्वारे संभाषण करू नये.

उपरोक्त बाबी संगणकप्रणालीद्वारे पर्यवेक्षण (Proctoring) करतेवेळी निदर्शनास आलेस सदर बाब प्रमाद समजून विद्यापीठ नियमानुसार अशा परीक्षार्थीवर कारवाई करणेत येईल. तरी सदर बाबी आपल्या स्तरावरून परीक्षार्थींना अवगत कराव्यात ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत : - **माहितीस्तव**

१. सर्व उपकुलसचिव व सहा.कुलसचिव परीक्षा विभाग
२. सर्व ऑन परीक्षा विभाग
३. परीक्षक नियुक्ती विभाग
४. आय. टी. सेल विभाग